18-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 5/17/2025 11:37 PM Page 1



'एनआयओ'चा अहवाल अवास्तव : खासदार फर्नांडिस यांचा आरोप » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



नीरज चोप्राने डायमंड लीगमध्ये रचला इतिहास » पान ४ वर

वेर्णा, रविवार, १८ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 255 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 18 May 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षात फूट

**दिल्ली, दि. १७ :** दिल्लीतील सत्ता गमावणाऱ्या अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षात फूट मोठी पडली आहे. दिल्ली महापालिकेत पक्षातील अनेक वरिष्ठ नेत्यांनी एकत्र येत वेगळा गट स्थापन केल्याची घोषणा केली आहे. याचा अर्थ आता महापालिकेत तिसरी आघाडी असेल. मुकेश गोयल या तिसऱ्या आघाडीचे नेते असतील. यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. दिल्ली महापालिकेत गेल्याच महिन्यात मोठा उलटफेर पाहायला मिळाला. भाजपचे नगरसेवक राजा इक्बाल सिंह नवे महापौर झाले. त्यांना १३३ मतं मिळाली. तर काँग्रेसचे उमेदवार मनदीप यांना केवळ ८ मतांवर समाधान मानावं लागलं. आपनं महापौर पदाच्या निवडणुकीवर बहिष्कार टाकला होता. आपनं निवडणुकीत उमेदवार दिला नव्हता. या संपूर्ण घटनाक्रमानंतर आपमधील नेत्यांमध्ये नाराजी पसरली होती. ही नाराजी स्पष्टपणे दिसून येत होती.

### अटारी-वाघा बॉर्डरुन होणारा व्यापर बंद

**नवी दिल्ली, दि. १७ :** पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव कायम आहे. या हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानसोबत कठोर पावले उचलत अटारी-वाघा बॉर्डरुन होणारा व्यापर बंद केला होता. अद्यापही पाकिस्तानसोबत व्यापार सुरु करण्यात आलेला नाही. दरम्यान, व्यापाऱ्यांसाठी दिलासा देणारी बातमी आहे. भारताने अफगाणिस्तानातून ट्रकच्या प्रवेशास मान्यता दिली आहे. भारताने पाकिस्तान सीमेवर अडकलेल्या सुमारे १६२ अफगाण ट्रकना प्रवेश परवानगी दिली आहे. या संदर्भात, शुक्रवारी (१६ मे) अफगाणिस्तानातून येणारे ५ ट्रक अटारी इंटिग्रेटेड चेकपोस्टवरून भारतात दाखल झाले आणि आज म्हणजेच शनिवार १७ रोजी १० ट्रक भारतात दाखल झाले. भारतीय अधिकाऱ्यांनी सुकामेवा आणि काजू घेऊन जाणाऱ्या सुमारे १६२ अफगाण ट्रकना प्रवेश दिला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर, भारत सरकारने ऑपरेशन सिंदूर सुरू केल्यानंतर पाकिस्तानसोबतचे व्यापार करार रद्द करण्यात आले आहेत. यामुळे प्रामुख्याने अफगाणिस्तान आणि इतर देशांमधून येणाऱ्या वस्तूंना अमृतसरच्या अटारी-वाघा सीमेवरून पाकिस्तानातून भारतात प्रवेश करण्यास अडचणी येत आहेत. ऑपरेशन सिंदूरनंतर अटारी-वाघा सीमेवरून होणारा व्यापार थांबला होता, परंतु शुक्रवारी पुन्हा एकदा भारत सरकारने अफगाण ट्रकना प्रवेश दिला.

### भारत अमेरिकन वस्तूंवरील कर १०० टक्के कमी : ट्रम्प

**वॉशिंग्टन, दि. १७ :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तानमधील युद्ध रोखण्यात मोठी भूमिका बजावल्याचा दावा केला आहे. दोन्ही देशांमधील तणाव इतका वाढला होता की ते अणुयुद्धाच्या अगदी जवळ पोहोचले होते, असे ट्रम्प यांनी म्हटलं आहे. ट्रम्प यांनी शुक्रवारी फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीत पुन्हा एकदा दावा केला. परिस्थिती खूप गंभीर झाली, पुढचे पाऊल काय असते, तुम्हाला माहिती आहे, शब्द नाही म्हणजेच अणुयुद्ध असे ट्रम्प म्हणाले. परराष्ट्र धोरणाच्या यशाबद्दल ट्रम्प म्हणाले की भारत-पाकिस्तान युद्ध थांबवणे हे त्यांच्या सर्वात मोठ्या यशांपैकी एक आहे. तथापि, त्यांना श्रेय मिळाले नाही. ट्रम्प म्हणाले की त्यांनी युद्ध थांबवण्याच्या बदल्यात त्यांच्याशी व्यापार करण्याचा प्रस्ताव दोन्ही देशांना दिला होता. आता मी हिशेब चुकता करण्यासाठी आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी व्यवसाय वापरत आहे. भारत आणि पाकिस्तान युद्धबंदीवर सहमत झाले आहेत. सामान्य ज्ञान आणि समजूतदार निर्णय घेतल्याबद्दल मी दोन्ही देशांचे अभिनंदन करतो.

# स्मार्ट सिटीचे 'रॉड्रिग्ज' यांच्यावर मेहरबान कोण?

▶ प्रकल्पातील अकार्यक्षमता आणि बट्ट्याबोळाला जबाबदार कोण?

▶ ८ महिन्यांपूर्वी बदली होऊनही 'रॉड्रिग्ज' गोव्यात का?

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १७ : गोवा स्मार्ट सिटी प्रकल्पातील कामकाजावर नागरिकांचा वाढता रोष आणि प्रशासनातील गोंधळ याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने अखेर कठोर पाऊल उचलले आहे. गोवा कॅडरचे वरिष्ठ आयएएस अधिकारी संजीत रॉड्रिग्ज यांची तातडीने लडाखला बदली करत १५ दिवसांच्या आत पदभार स्वीकारण्याचे आदेश केंद्रीय गृह मंत्रालयाने मंगळवारी जारी केले. आदेश न पाळल्यास पगार थांबवणे, पदोन्नतीवर बंदी आणि पुढील प्रतिनियुक्तीला स्थगिती यांसह कारवाई करण्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. मात्र गेल्या ८ महिन्यांपूर्वी बदली झालेली असतानाही रॉड्रिग्ज गोव्यात कसे राहिले याबाबत उलटसुलट चर्चा सुरू आहे.**



रॉड्रिग्ज यांची (अरुणाचल-गोवा-मिझोरम-युनियन टेरिटरी) संवर्गात २०१३ बॅचमध्ये निवड झाली. सप्टेंबर २०२४ मध्येच त्यांची लडाखमधील सचिव (नगरविकास) म्हणून नियुक्ती जाहीर झाली होती. मात्र स्मार्ट सिटीमधील अपूर्ण प्रकल्प तसेच कौटुंबिक कारणे पुढे करून त्यांनी बदली पुढे ढकलण्याची विनंती केली. गृह मंत्रालयाने सहा महिने प्रतीक्षा केल्यानंतर आता अधिक विलंब सहन करणार नाही अशी भूमिका घेतली आहे.

कोणतीही स्थगन कारणे यापुढे स्वीकारली जाणार नाहीत, तसेच संबंधित अधिकाऱ्याने ३१ मे पूर्वी लडाखमध्ये हजर न झाल्यास त्यांचा अनुपस्थिती कालावधी अनधिकृत' ठरेल असे अवर सचिव राकेश कुमार सिंग, गृह मंत्रालय यांनी आपल्या १२ मेच्या आदेशात म्हटले आहे . सध्या रॉड्रिग्ज मसुरी येथील लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमीत चार आठवड्यांच्या कार्यक्रमाला उपस्थित आहेत. त्यानंतर थेट लडाखकडे प्रस्थान करण्याचे निर्देश त्यांना मिळाले आहेत. पणजी स्मार्ट सिटीच्या १,१०० कोटी रुपये किंमतीच्या योजनेंतर्गत ड्रेनेज, रस्ते पुनर्बांधणी व वाहतूक व्यवस्थापनाचे ३७ प्रकल्प हाती घेण्यात आले. यापैकी १८ प्रकल्प ठराविक मुदतीत पूर्ण झालेले नाहीत. उखडलेल्या रस्त्यांमुळे गेल्या वर्षभरात ४० हून अधिक अपघात झाले, तर मुसळधार पावसात बाजारपेठा जलमय झाल्या. विरोधी पक्ष आणि व्यापारी संघटनांनी विधीमंडळात तसेच रस्त्यावर प्रशासनाला जाब विचारला. जवळपास सगळे निर्णय एकाच अधिकाऱ्याच्या टेबलावर अडकून राहिले, असा आरोप सगळीकडून होत राहीला.

राज्याचे नगरविकास सचिव विवेक पांडे म्हणाले की, प्रकल्पांच्या लांबणीला एकाहून अधिक घटक जबाबदार आहेत; मात्र नियुक्ती आदेशाचे पालन करणे ही प्राथमिक शिस्त आहे. गृह मंत्रालयाच्या निर्देशानंतर आम्ही रॉड्रिग्ज यांना कार्यमुक्त करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. सेवा नियमांनुसार कोणताही आयएएस अधिकारी बदली आदेशानंतर १५ दिवसांत रुजू न झाल्यास स्थायी मुक्त' समजला जातो. त्यानंतर वेतन रोखले जाऊ शकते आणि शिस्तभंग समितीसमोर सुनावणी होते. केंद्राने रॉड्रिग्ज यांना शेवटची संधी दिली असून ३१ मेपर्यंत लेह सचिवालयात हजर न झाल्यास पुढील कारवाई अनिवार्य ठरेल.

## म्हादई जलविवाद : शास्त्रज्ञांच्या अहवालावर वाद

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १७ :** म्हादई बचाव अभियानाचे सचिव राजेंद्र केरकर यांनी राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था च्या तीन शास्त्रज्ञांनी तयार केलेल्या अहवालावर टीका केली आहे. केरकर म्हणाले, या शास्त्रज्ञांनी म्हादई परिसरातील पर्जन्यमानाचा अभ्यास केलाय, पण त्यांना कधीही म्हादई परिसराची प्रत्यक्ष भेट नाही, तसेच गोव्यातील म्हादई आणि कर्नाटकातील भीमगड अभयारण्येही त्यांनी पाहिली नाहीत. पाइपलाइन, पंपहाऊसेस, ओपन कट चॅनेल आणि कालव्यांच्या बांधकामामुळे या परिसरातील पर्यावरण आणि वन्यजीवांना मोठा धोका निर्माण झाला आहे. तसेच, म्हादई जलविवाद न्यायाधिकरणाच्या अंतिम निकालातील उत्पन्न गणनेच्या आकडेवारीलाही त्यांनी आव्हान दिले आहे.

'सेव्ह गोवा सेव्ह टायगर'चे संयोजक राजन घाटे यांनी म्हादई प्रकरणातील राजकीय भूमिका अधोरेखित करत म्हटले की, म्हादई ही तुटीची नदी आहे. मुख्यमंत्री सतत म्हादईला आई म्हणतात, मात्र त्यांच्या राजकीय हितासाठी ते केंद्र सरकारकडे पाठ फिरवत आहेत. कर्नाटकात २८ खासदार असून गोव्यात फक्त २ खासदार आहेत, त्यामुळे केंद्र कर्नाटकला प्राधान्य देत आहे. कर्नाटकचे खासदार म्हादईसाठी एकत्र येतात, पण गोव्याच्या काँग्रेस खासदारांनी आणि आमदारांनी संरक्षणासाठी एकत्र येण्याचे आवाहन केलेले नाही.

सर्वोच्च न्यायालयातील वकील आणि म्हादई प्रकरणातील म्हादई बचाव अभियानाचे प्रतिनिधी ॲड. भवानीशंकर गडनीस यांनी म्हटले, प्रवाह संस्थेच्या अहवालानुसार, कर्नाटक सरकार गोव्याला म्हादई नदीच्या पात्रात सिट्रे इंजेक्शनसाठी परवानगी देण्यास तयार नाही. त्यामुळे गोवा सरकारने हा अंतिम अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर करावा आणि निकालासाठी अपील करावी. आणखी कोणताही अहवाल प्रकरणाची लांबच लांबणीवर टाकू शकतो. माधव गाडगीळ आणि कस्तुरीरंगन यांचे अहवाल सर्व प्रश्न स्पष्ट करतात.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी एनआयओ चा अहवाल राज्य सरकारने नियुक्त केला नसल्याचे स्पष्ट केले आहे. शनिवारी फोंडा येथे पत्रकारांशी बोलताना सावंत म्हणाले की, राज्य सरकारने म्हादई नदीच्या पाणीवाटेवर संशोधनासाठी एनआयओला नेमले नाही. त्यांनी हा अहवाल स्वतंत्रपणे तयार केला असेल. आमचे सरकार त्याचा भाग नाही आणि हा अहवाल गोव्याच्या सर्वोच्च न्यायालयातील खटल्यावर कोणताही परिणाम करणार नाही.

## कळंगुटमध्ये अनधिकृत बांधकामे पाडण्याचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १७ :** मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने कळंगुट ग्रामपंचायतीला दोन अनधिकृत इमारती पाडण्याच्या आदेशावर पुढे कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या संदर्भात बार्देश तालुक्यातील म्हापसा येथील ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसर (बीडीओ) यांनाही आवश्यक सहकार्य करण्यास सांगण्यात आले असून, त्यांनी आदेशाच्या दिनांकापासून दोन आठवड्यांत कारवाईसाठी मदत करावी, असे न्यायालयाने म्हटले आहे.

मार्च २०२५ मध्ये कळंगुट ग्रामपंचायतीने जोसेफ एस. रोसा यांना नोटीस बजावून २२ डिसेंबर २०११ रोजी जारी करण्यात आलेल्या पाडण्याच्या आदेशातील इमारतींसाठी आवश्यक मंजुरीचे दस्तऐवज (मंजूर आराखडा, बांधकाम परवाना आणि भोगवटा प्रमाणपत्र) सादर न केल्याचे निदर्शनास आणून दिले होते.

पण प्रत्यक्षात बांधकामे न पाडल्याने सिल्वेस्टर डिसोझा यांनी या विरोधात हस्तक्षेप करत उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. त्यानंतर ८ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या तपासणीत अनधिकृत बांधकामे अद्याप अस्तित्वात असल्याचे स्पष्ट झाले. यावर आधारित अहवालाच्या आधारे ग्रामपंचायतीने पुन्हा पाडण्याचे आदेश जारी केले.

या प्रकरणात प्रतिवादी जोसेफ एस. रोसा यांचे वकील ॲड. जे. ए. लोबो यांनी २०२० मध्ये गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटी (जीसीझेडएमए) संदर्भात दाखल केलेल्या जनहित याचिकेचा दाखला देत, संबंधित संरचना खरोखरच सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन करतात का, याची तपासणी व्हावी, असे न्यायालयाचे आधीचे निर्देश आठवले.

तसेच ॲड. लोबो यांनी न्यायालयाला याकडे लक्ष वेधले की, २८ जानेवारी २०१० रोजीच्या आदेशात ग्राउंड प्लस टू स्ट्रक्चरचा दुसरा मजला आणि १२ ऑक्टोबर २०१२ च्या आदेशात ग्राउंड प्लस वन स्ट्रक्चर तसेच स्विमिंग पूल पाडण्याचे निर्देश होते. मात्र, तपासणी अहवालात या दोन्ही संरचना पाडल्याचे नमूद आहे.

याविषयी न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, नंतर झालेल्या एका अधिकृत तपासणीत मात्र २२ डिसेंबर २०११ च्या नोटीस आणि ८ एप्रिल २०२५ च्या पंचायतीच्या अहवालाचा उल्लेख असून, त्या अहवालानुसार संबंधित संरचना अजूनही जागेवर अस्तित्वात असल्याचे स्पष्ट दिसून येते. कोणतीही इमारत प्रत्यक्षात पाडलेली नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

न्यायालयाने म्हटले की, २२ डिसेंबर २०११ रोजीच्या पाडण्याच्या आदेशाची अंमलबजावणी ग्रामपंचायतीकडून आता केली जात असल्याने, प्रतिवादी रोसाकडून नोंदवलेला विरोध अर्थहीन ठरतो. कारण, संबंधित बांधकामे कोणतीही अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आली असून ती पूर्णपणे बेकायदेशीर आहेत.

## राज्यातील पहिले वातानुकूलित प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १७ :** गोव्यातील आरोग्यसेवा क्षेत्रात महत्त्वाची भर घालत, राज्यातील पहिले पूर्णपणे वातानुकूलित प्राथमिक आरोग्य केंद्र चिंचिणी येथे शनिवारी कार्यान्वीत करण्यात आले. या सुविधेमुळे रुग्णांना अधिक आरामदायी व गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मिळणार असून, आरोग्य सेवा वितरणाच्या पातळीत लक्षणीय सुधारणा अपेक्षित आहे.

या अत्याधुनिक आरोग्य केंद्राचे उद्घाटन वेळ्ळीचे आमदार क्रूझ सिल्वा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी देवसु -चिंचिणी पंचायतीचे सदस्य, पीएचसीचे प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. निक्सन फर्नांडिस, फादर व्हिक्टर व्हिएगस, आरोग्य केंद्रातील कर्मचारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार निधीतून उभारण्यात आलेल्या या अद्ययावत सुविधेबाबत बोलताना आमदार सिल्वा म्हणाले की, मर्यादित संसाधनांतून देखील चिंचिणी पीएचसीने उत्कृष्ट सेवा दिली आहे. आता ही सुधारित सुविधा त्या सेवेच्या प्रती एक सन्मानच आहे. यामुळे रुग्णांना आराम मिळेल आणि कर्मचारी अधिक सक्षमपणे काम करू शकतील.

चिंचिणी पीएचसीमध्ये सध्या विविध वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत. त्यामध्ये सामान्य बाह्यरुग्ण विभाग, आपत्कालीन सेवा, प्रयोगशाळा, औषधनिर्माण युनिट, नेत्र व दंत उपचार विभाग तसेच आयुर्वेदिक व होमिओपॅथिक सेवा यांचा समावेश आहे. या सुविधा आता संपूर्णपणे वातानुकूलित वातावरणात कार्यरत राहणार आहेत. वातानुकूलन प्रणालीमुळे उन्हाळ्याच्या दिवसांत रुग्णांसाठी सुसह्य उपचाराचा अनुभव मिळणार आहे. यामुळे केवळ रुग्णांचेच नव्हे, तर आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कामाच्या गुणवत्तेतही वाढ होणार असल्याचे डॉ. फर्नांडिस यांनी सांगितले.

याप्रसंगी आमदार सिल्वा यांनी क्षेत्रातील आरोग्यसेवा अधोरेखित करत, लवकरच चिंचिणी मध्ये २४ तास कार्यरत आपत्कालीन वैद्यकीय सेवा केंद्र सुरू केले जाईल. या दिशेने प्रयत्न सुरु असून ते अंतिम टप्प्यात आहे, असे सांगत नागरिकांना दिलासा दिला.

तसेच त्यांनी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि आरोग्यमंत्री विश्वजीत राणे यांचे विशेष आभार मानले. ही केवळ भौतिक सुविधा नाही, तर गोव्याच्या ग्रामीण आरोग्यसेवेच्या दर्जाची पुन्हा एक नवी व्याख्या आहे. आपल्या लोकांना आधुनिक व सुसज्ज सेवा मिळायला हव्यात आणि यासाठी मी कटिबद्ध आहे,असे ते म्हणाले.

पान २ ▶

# 'ऑपरेशन सिंदूर'च्या भारतीय हेरांना अटक

## महत्त्वाची माहिती पाकिस्तानला पाठवत असल्याचे तपासणीत उघड

**चंदीगढ, दि. १७ :**

पाकिस्तानातील गुप्तचर संस्थेशी कथित संबंध ठेवून 'ऑपरेशन सिंदूर' संदर्भातील संवेदनशील माहिती पाकिस्तानला पाठवल्याच्या आरोपावरून हरियाणा व पंजाब पोलिसांनी चार जणांना अटक केली आहे. अटकेतील प्रमुख नाव म्हणजे ट्रॅव्हल विद जो' या यूट्यूब चॅनेलची निर्माती व हिसारची ट्रॅव्हल व्लॉगर ज्योती मल्होत्रा . तिच्यासह कैथलमधील मस्तगढ गावातील २५ वर्षीय देवेंद्र सिंग, तसेच पंजाबच्या मालेरकोटला येथील एक महिला गुजा ला आणि तिचा सहयोगी यामिन मोहम्मद यांना पोलिस कोठडीत ठेवण्यात आले आहे.

हरियाणातील हिसार पोलिस अधिकाऱ्यांनी माध्यमांना याबाबत दिलेल्या माहितीनुसार, गुप्तचर यंत्रणेकडून मिळालेल्या माहितीनंतर ज्योती मल्होत्रावर अधिकृत गुप्तता कायदा व भारतीय दंड संहितेतील कलम १५२ अंतर्गत कारवाई करण्यात आली . तिच्या मोबाईल व लॅपटॉपमध्ये संशयास्पद फाईल्स आढळल्या असून तिला पाच दिवसांच्या रिमांडवर घेतल्याचे ते म्हणाले. पोलिसांचे म्हणणे आहे की मल्होत्रा एका पाकिस्तानी नागरिकाशी सातत्याने संपर्कात होती.

ज्योतीचे वडील हरीश कुमार यांनी पत्रकारांना सांगितले की, गुरुवारी सकाळी ९.३० वाजता पाच-सहा पोलिस अधिकाऱ्यांनी घराची झडती घेतली. त्यांनी एक लॅपटॉप व तीन मोबाईल फोन जप्त केले. त्यांच्या मते, ज्योती फक्त एकदाच, तीही अधिकृत व्हिसावर, पाकिस्तानला गेली होती.

दरम्यान, हरियाणाच्या स्पेशल डिटेक्टिव्ह युनिटने कैथल जिल्ह्यातील देवेंद्र सिंगला अटक केली. डीएसपी वीरभान सिंग याबाबत म्हणाले की, देवेंद्रने कर्तारपूर साहिब दर्शनाच्या बहाण्याने पाकिस्तानात जाऊन आयएसआयच्या एजंटांशी थेट संपर्क साधला. भारतात परतल्यानंतर त्याने लष्करी छावण्यांची छायाचित्रे काढून ती पाकिस्तानी अधिकाऱ्यांना पाठवली. त्याच्याकडील मोबाईल व इतर इलेक्ट्रॉनिक साधने पोलिसांनी ताब्यात घेतली असून फॉरेंसिक तपास सुरू आहे.




पंजाब पोलिसांनी ११ मे रोजी मालेरकोटला येथून गुजा ला आणि यामिन मोहम्मद यांना अटक केली. पंजाबचे डीजीपी गौरव यादव यांनी सोशल मीडियावर लिहिले की, दोघेही पाकिस्तान उच्चायोगात नियुक्त अधिकाऱ्याला गोपनीय दस्तऐवज पाठवून ऑनलाईन व्यवहाराद्वारे पैसे स्वीकारत होते. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातील दोन मोबाईल फोन जप्त करून व्यवहारांचे डिजिटल पुरावे संकलित केले आहेत.

अटकेतील सर्व आरोपींवर ऑफिशियल सीक्रेट्स ॲक्ट १९२३, भारतीय दंड संहिता, व भारतीय सुरक्षा कायदे अंतर्गत प्रकरणे नोंदवली असून दोन्ही राज्यांचे विशेष तपास पथक संयुक्तरीत्या चौकशी करत आहेत. प्राथमिक तपासात किमान दोन पाकिस्तानी हँडलर्स'शी थेट संवादाचे धागेदोरे सापडल्याचा पोलिसांचा दावा आहे.

तज्ज्ञांच्या मते, लष्करी हालचालींबाबतची माहिती डिजिटल प्लॅटफॉर्मवरून लीक होण्याच्या घटना वाढल्या आहेत. केंद्रीय गृहमंत्रालयाने नुकतेच राज्यांना संवेदनशील क्षेत्रांभोवती ड्रोन-कॅमेरा निर्बंध कडक करण्याचा सल्ला दिला आहे. ऑपरेशन सिंदूर विषयक अधिकृत तपशील गोपनीय असले, तरी सुरक्षादलांचा सतर्कतेचा इशारा लक्षात घेता या अटकेला महत्त्व प्राप्त झाले आहे. संपूर्ण चौकशीनंतर दोष सिद्ध झाल्यास आरोपींना दहा वर्षांपर्यंत कारावासाची, तसेच आर्थिक दंडाची तरतूद आहे. पुढील सुनावणीसाठी त्यांना लवकरच स्थानिक न्यायालयात हजर केले जाणार आहे.